# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र.एमओपी/४८१४ दि.१.१०.२०१४

विषयः दि. २ ऑक्टोबर २०१४ रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त स्वच्छता शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजित करणे.

संदर्भः शासन परिपत्रक क्र.- जपुती २२१४/प्र.क्र.३४९/२९ दि.३० सप्टेंबर २०१४.

-----

महोदय,

उपरोक्त संदर्भान्वये प्राप्त झालेले शासनाचे परिपत्रक कृपया अवलोकित करावे. त्या अनुषंगाने सर्व खाते प्रमुख /सहाय्यक आयुक्त यांना पाठवावयाचा परिपत्रकाचा क्र. एमओपी /४८१४ दि.१.१०.२०१४ सोबत जोडत आहे.

उपरोक्त परिपत्रकाप्रमाणे ई-ऑफिस, ई-मेल, लघु संदेश (एसएमएस), व्हॉटस् ॲप इत्यादी माध्यामातून अग्रेषित करण्याच्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. मा. अति.आयुक्त (प्रकल्प) यांच्या आदेशान्वये माहिती व तंत्रज्ञान खात्याशी समन्वय साधावा.

सह प्रमुख कर्मचारी अधिकारी (सर्वसाधारण)

प्रमुख अधिकारी (आपत्कालीन व्यवस्थापन)

संचालक (माहिती व तंत्रज्ञान)

बृहन्मुंबई महानगरपालिका

परिपत्रक

क्र.एमओपी/४८१४ दि.०१.१०.२०१४.

विषय : दिनांक २ ऑक्टोबर,२०१४ रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त स्वच्छता शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजित करणे.

संदर्भ : शासन परिपत्रक क्र.- जपुती २२१४/प्र.क.३४९/२९ दि.३० सप्टेंबर २०१४.

.......

उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने असे आदेश देण्यात येत आहेत की, महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या जयंती दिनानिमित्ताने, त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे व केंद्रशासनाच्या 'स्वच्छ भारत' अभियाना अंतर्गत गांधी जयंतीच्या निमित्ताने 'स्वच्छता शपथ' घेण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. प्रस्तुत समारंभासाठी जनसंपर्क अधिकारी यांनी महात्मा गांधी/लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस दोन पुष्पहार गुरुवार दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत तयार ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच पर्यायी व्यवस्था सुध्दा ठेवावी.

सदर कार्यक्रम महानगरपालिका मुख्यालयाच्या पहिल्या मजल्यावरील गच्चीत (गेट नं.२च्या वर) सकाळी ९.४५ वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. कृपया सर्व खातेप्रमुख/विभागप्रमुख यांनी बहुसंख्येत उपस्थित राहावे.

तसेच याद्वारे असे सूचित करण्यात येते की, सर्व सहाय्यक आयुक्त/विभागप्रमुख/खाते प्रमुख यांनी त्यांच्या स्तरांवर कार्यक्रम आयोजित करुन त्याबाबतचा अहवाल मा.आयुक्त यांना सादर करावा.

| सही/-१.१०.२०१४ | सही/-१.१०.२०१४ | सही/-१.१०.२०१४ |
|---|---|---|
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त(सा.प्र.) | अति.आयुक्त (प्रकल्प) |

प्रत : माहितीकरिता व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

1/10/14

सहप्रमुख कर्मचारी अधिकारी(सर्वसाधारण)

दि.२ ऑक्टोबर २०१४ रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त स्वच्छता शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजित करणे.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
**शासन परिपत्रक क्रमांक - जपुती २२१४/प्र.क्र.३४९/२९**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२.
**दिनांक- ३० सप्टेंबर २०१४**

<u>शासन परिपत्रक-</u>

दिनांक २ ऑक्टोबर २०१४ रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त दिनांक २८ नोव्हेंबर २०१३ च्या अधिसूचने अन्वये सार्वजनिक सुट्टी घोषित करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक ६ जानेवारी २०१४ च्या परिपत्रकान्वये सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयांमध्ये महात्मा गांधी जयंती व लाल बहादुर शास्त्री जयंती साजरी करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान राबविण्यासंबंधी राज्य शासनाला सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार दिनांक २ ऑक्टोबर २०१४ रोजी सकाळी ९.४५ वाजता सर्व शासकीय कार्यालयात महात्मा गांधी जयंती निमित्त स्वच्छता शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. कार्यालयातील सर्व शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी बहुसंख्येने स्वच्छता शपथ घेण्यासाठी कार्यालयात उपस्थित रहावे. शपथेची प्रत सोबत जोडली आहे. सद्य:स्थितीत राज्यात आचारसंहिता लागू असल्यामुळे निवडणुक आयोगाने दिनांक २७ सप्टेंबर, २०१४ रोजी दिलेल्या सूचनेची प्रत सोबत जोडली आहे, त्याचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

३. सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या विभागातील / जिल्ह्यांतील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयांना सदर कार्यक्रम आयोजित करण्याबाबतच्या आवश्यक त्या सूचना देऊन त्यांच्या अंमलबजावणीसाठी योग्य ती कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(प्र.प्र.गोसावी)
उप सचिव, सा.प्र.विभाग

प्रत,
मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव , मंत्रालय ,मुंबई ३२.
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ३२.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई ३२.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
आयुक्त, सर्व महानगरपालिका, महाराष्ट्र राज्य
निवडनस्ती/कार्यासन-२९

# स्वच्छतेची शपथ

महात्मा गांधींनी ज्या भारताचे स्वप्न पाहिले होते त्यामध्ये केवळ राजनैतिक स्वातंत्र्यच नव्हते तर एक स्वच्छ व विकसित देशाची कल्पनाही होती. महात्मा गांधींनी गुलामीतून भारत मातेला मुक्त करुन स्वातंत्र्य मिळवून दिले.

आता भारत मातेला अस्वच्छतेतून मुक्ती देऊन देशाची सेवा करणे आपले आद्य कर्तव्य आहे.

मी शपथ घेतो की, मी स्वतः स्वच्छतेच्या बाबतीत जागरुक राहील आणि त्यासाठी वेळही देईल.

दरवर्षी १०० तास म्हणजेच प्रत्येक आठवडयातून दोन तास श्रमदान करुन स्वच्छतेच्या या संकल्पाला पूर्ण करीन.

मी स्वतः घाण करणार नाही, आणि दुसऱ्यालाही करु देणार नाही.

सर्वप्रथम की स्वतःपासून, माझ्या कुटुंबापासून, माझ्या गल्ली/वस्तीपासून, माझ्या गावापासून तसेच माझ्या कार्यस्थळापासून या कामास सुरुवात करेन.

मला हे मान्य आहे की, जगामधील जे देश स्वच्छ आहेत, त्याचे कारण त्या ठिकाणचे नागरिक स्वतः घाण करीत नाही व घाण करु देत नाहीत.

या विचारांनी मी गावोगावी आणि गल्लोगल्ली स्वच्छ भारत मिशनचा प्रचार करेन.

मी आज जी शपथ घेत आहे, ती आणखी शंभर लोकांनाही घ्यायला लावेल.

तेही माझ्यासारखेच स्वच्छतेसाठी १०० तास देतील यासाठी मी प्रयत्न करेन.

मला माहीत आहे की, स्वच्छतेच्या दिशेने टाकलेले माझे हे एक पाऊल संपूर्ण भारत देशाला स्वच्छ करण्यासाठी मदत करेल.

भारत निर्वाचन आयोग
Election Commission of India

निर्वाचन सदन
NIRVACHAN SADAN
अशोक रोड, नई दिल्ली - 110 001
ASHOKA ROAD, NEW DELHI - 110 001

NO. 437/MH-LA/2014 (MCC)

Dated: 27th September, 2014

To,

The Chief Electoral Officer,
Maharashtra,
Mumbai.

Sub: General Election to Maharashtra Legislative Assembly, 2014- MCC reference - Permission for observing *'National Sanitation Campaign* - regarding.

Sir,

I am directed to refer to your letter No. CEO 2014/022/XXXIII dated 24th September, 2014, on the subject cited, and to state that the Commission has no objection to your proposal, subject to the following conditions-

1. Political functionaries including Chief Minister, Ministers and political functionaries holding posts under the Govt shall not use this campaign for furthering their political interests and would ensure that no political content is mixed with the subject matter of the campaign in their speeches with a view to influencing the voters.
2. Election machinery involved in ongoing Assembly Elections shall not be engaged in this campaign till the election process is over.
3. Print and electronic media advertisements issued by the Central Govt or the State Govt or any other agencies of the Govt shall not carry the photographs of political functionaries and will be limited to the contents of the campaign in the election going states.

Kindly inform all concerned for strict compliance.

Yours faithfully,

(R.K.Srivastava)
Principal Secretary

Copy to Chief Electoral Officer, Haryana for information.

" महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या जयंती दिनानिमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्याचा व स्वच्छता शपथ घेण्याचा मंत्रालयात होणारा कार्यक्रम "

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक: जपुती- २२१४/प्र.क्र.३४८ /२९,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३० सप्टेंबर २०१४.

परिपत्रक

गुरूवार दिनांक २ ऑक्टोबर,२०१४ रोजी सकाळी ९.४५ वाजता मा.राज्यपाल महोदयांच्या उपस्थितीत महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या जयंती दिनानिमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे व केंद्र शासनाच्या " स्वच्छ भारत "अभियाना अंतर्गत गांधी जयंतीच्या निमित्ताने " स्वच्छता शपथ " घेण्याचा कार्यक्रम, मंत्रालय, मुख्य इमारत येथील नवीन प्रवेशद्वारा समोरील मोकळ्या जागेत आयोजित करण्यात आला आहे.

२. उप सचिव ( प्रशासन -४ ) सार्वजनिक बांधकाम विभाग यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत समारंभासाठी महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांचा फोटो तसेच दोन पुष्पहार व २०० लाल गुलाब कळ्या गुरूवार दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत तयार ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच पर्यायी व्यवस्था सुद्धा ठेवावी.

३. प्रस्तुत समारंभास अधिकारी /कर्मचारी यांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे, अशी विनंती करण्यात येत आहे.

( र.ग.पांचाळ )
अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग ,मंत्रालय, मुंबई,
सर्व मा. अपर मुख्य सचिव, /प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय मुंबई,
सर्व मंत्रालयीन आस्थापना ( त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी विभागातील सर्व

अधिकारी, कर्मचारी यांना उपरोक्त कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित राहण्याबाबत निर्देश द्यावेत)
महासंचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
उप सचिव (प्रशासन-४),सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई
अधिक्षक उपवने व उद्याने, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
सुरक्षा अधिकारी, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
निवड नस्ती/सामान्य प्रशासन विभाग/का.२९